19 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# 'फुटबॉल' खेळाडूंची विद्यापीठास सदिच्छा भेट

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

मिदनापूर (पश्चिम बंगाल) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या शिवाजी विद्यापीठ फुटबॉल संघातील खेळाडूंनी मंगळवारी प्रभारी कुलगुरु डॉ. डी. आर. मोरे यांची सदिच्छा भेट घेतली. डॉ. मोरे यांनी राष्ट्रीय स्पर्धेतील उज्ज्वल कामगिरीसाठी संघाला शुभेच्छा दिल्या.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रीडा अधिविभागप्रमुख पी. टी. गायकवाड, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, संघ प्रशिक्षक अभिजीत वणीरे, संघ व्यवस्थापक एन. आर. कांबळे यांच्यासह खेळाडू उपस्थित होते. भोपाळच्या बरकतुल्लाह विद्यापीठात गेल्या ४ ते १३ जानेवारी या कालावधीत झालेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संघाने तृतीय स्थान पटकावले. कर्णधार अक्षय मेथे (शहाजी महाविद्यालय) यांच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या या संघातील खेळाडू ऋषिकेश मेथे याला स्पर्धेतील सर्वाधिक गोल करणारा खेळाडू म्हणून गौरविण्यात आले. हा संघ मिदनापूर येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे.



**कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या शिवाजी विद्यापीठ फुटबॉल संघातील खेळाडूंनी प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांची सदिच्छा भेट घेतली. याप्रसंगी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. आर. व्ही. गुरव, संघ प्रशिक्षक अभिजीत वणीरे, संघ व्यवस्थापक एन. आर. कांबळे.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JAN 2017
लोकमत

# शिवाजी विद्यापीठ फुटबॉल संघ पात्र

कोल्हापूर : मिदनापूर (पश्चिम बंगाल) अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ फुटबॉल संघ पात्र ठरला आहे. त्यातील खेळाडूंनी मंगळवारी प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांची सदिच्छा भेट घेतली. डॉ. मोरे यांनी यावेळी राष्ट्रीय स्पर्धेतील उज्ज्वल कामगिरीसाठी संघाला शुभेच्छा दिल्या. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रीडा अधिविभाग प्रमुख पी. टी. गायकवाड, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, संघप्रशिक्षक अभिजित वणिरे, संघव्यवस्थापक एन. आर. कांबळे आदींसह खेळाडू उपस्थित होते. हा संघ मिदनापूर येथे दि. ८ ते १४ फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 JAN 2017

महाराष्ट्र टाईम्स

# तंत्रज्ञान विभागात फुलतेय हिरवाई

**नितीश खानविलकर**
डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, शिवाजी विद्यापीठ



शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान विभागाच्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्यावतीने विभागाच्या परिसरात विविध वृक्षांचे रोपण करुन त्यांचे जतनही केले जात आहे. यानिमित्ताने परिसरात हिरवाई फुलू लागली आहे.ऑगस्ट २०१५ मध्ये केबिनमध्ये उन्हाची प्रखर किरणे येत असल्याने यापासून बचाव करण्यासाठी प्रा. चेतन आवटी यांनी चार रोपांचे रोपण केले. या रोपांनी डौलदार रुप धारण केल्यानंतर खऱ्या अर्थाने अभियानाला सुरुवात झाली.

करंबळ, कारंज, कडूलिंब, अशोक, पिंपळ, वड, बदाम, सोनचाफा, गुलमोहर, रेन ट्री, आंबा यांसारखी रोपेही लावण्यात आली. हळूहळू यात एकेक झाडांची वाढ होत गेली. विभागातील कार्यक्रमांचे औचित्य साधून मोकळ्या जागेत या झाडांचे शिस्तबधद्ध रोपण केले.

दैनंदिन कामांमुळे रोपे जगवण्यासाठी वेगळा वेळ देणे अशक्य असल्याने खास रविवारचा सुटीच्या दिवसाची निवड केली. रविवारी सकाळी विभागामध्ये येऊन झाडांना पाणी देणे, आवश्यकतेनुसार माती पुरवणे, कीटकनाशकांची फवारणी यासारखी कामे अगदी आवडीने प्रा. आवटी यांनी सुरु केली. तसेच रोजच्या वेळापत्रकातून एक तास ते या झाडांसाठी देतात. झाडांना नियमित पाणी मिळावे यासाठी त्यांना या कामात संपत कांबळे, नंदकुमार झांजगे आणि विद्यार्थ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**या कामातून सामाजिक बांधिलकी जपल्याचा तसेच आपल्या विभागासाठी काहीतरी वेगळी जबाबदारी पार पाडण्याचा आनंद मिळतो. त्यामुळे पर्यावरणाचे जतन आणि संवर्धनही होत आहे. या उपक्रमात कॉलेजचे तत्कालीन संचालक डॉ. गिरीष कुलकर्णी यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.**

**- प्रा. चेतन आवटी**

प्रा. अनिरुद्ध जोशी यांनीही पुढाकार घेऊन मेकॅनिकल वर्कशॉपच्या बाजूला ४० रोपांची लागण केली आहे. यातील ३० झाडे याच विभागात शिकणाऱ्या धीरज पाटील या विद्यार्थ्याने दिली आहेत. वृक्ष लागवडीसाठी वर्कशॉप सहायक आशीष माने, निलेश कोराडे आणि विद्यार्थ्यांची मदत घेतली. तंत्रज्ञानचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी या उपक्रमाला सहकार्य केले. पर्यावरण अभियांत्रिकी विभागाचे प्रा. अमोल कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांसमवेत १०१ झाडांची तंत्रज्ञान विभाग परिसरात लागवड केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 JAN 2017

सकाळ

# शिवाजी विद्यापीठात उद्या कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्रामार्फत लैंगिक अल्पसंख्याक व सामाजिक वंचितीकरण (Sexual Minorities and Social Exclusion) विषयावर २० जानेवारीला कार्यशाळा होत आहे. गणित अधिविभागाच्या रामानुजन हॉलमध्ये कार्यशाळा होईल. त्यात बिंदूमाधव खिरे, मीना सेशू, प्रा. डॉ. राजन गवस, डॉ. जगन कराडे, गौरी सावंत मार्गदर्शन करणार आहेत.